**L. C. BILL No. VIII OF 2026.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE SKILLS UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2024.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८.**

**महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२४ चा महा. ३५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:-

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(शा.म.मु.) एचबी ३५२०–१ (६००—३-२०२६)

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये, भाग दोन मधील, तक्त्यामध्ये, पुढील नोंदी समाविष्ट करण्यात येतील:- २०२४ चा महा. ३५.

| | |
|---|---|
| “१. पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठ, लोदगा, मु. पो. लोदगा, गट क्रमांक २३८, फिनिक्स एज्युकेशनल कॅम्पस, तालुका औसा, जिल्हा लातूर-४१३ ५३१. | फिनीक्स फाउंडेशन संस्था, लातूर, नोंदणी क्रमांक महा/१८५८४/०८/ लातूर, विठ्ठल हाऊसिंग सोसायटी, चर्चजवळ, नांदेड रोड, लातूर-४१३ ५१२, येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) अन्वये नोंदणीकृत केलेली संस्था. |
| २. फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्युअरशिप विद्यापीठ, पुणे, सेक्टर ए ४, सर्वे नं. १६/१/१, फॉरेस्ट ट्रेल्स टाउनशिप, परांजपे स्कीम्स, पौड रोड, भुगाव, पुणे, महाराष्ट्र-४१२ ११५. | फ्युयल (फ्रेंड्स युनियन फॉर एनरझेयझिंग लिव्हज), नोंदणी क्रमांक इ ४९१३/ पुणे, सेक्टर ए ४, सर्वे नं.१६/१/१, फॉरेस्ट ट्रेल्स टाउनशिप, परांजपे स्कीम्स, पौड रोड, भुगाव, पुणे, महाराष्ट्र-४१२ ११५, येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (१९५० चा २९) अन्वये नोंदणीकृत केलेली संस्था.”. |

**उद्देश व कारणे यांचे निवेदन.**

महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ (२०२४ चा महा. ३५) यामध्ये, महाराष्ट्र राज्यातील कौशल्य शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठांची स्थापना, विधि संस्थापन व विनियमन करण्याची तरतूद केली आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद केली आहे की, शासन, कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने, कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे, याबाबत खात्री पटली असेल तर, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून अनुसूचीमध्ये केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोन मध्ये, खाजगी कौशल्य विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय समाविष्ट करून, त्याद्वारे खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देऊ शकेल.

**३.** उक्त कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की, "पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठ, लोदगा" आणि "फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्युअरशिप विद्यापीठ, पुणे " या नावाने खाजगी कौशल्य विद्यापीठे स्थापन करण्यासाठी अनुक्रमे फिनिक्स फाउंडेशन संस्था लातूर आणि फ्युयल (फ्रेंड्स युनियन फॉर एनरझेयझिंग लिव्हज) या प्रायोजक मंडळांनी कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे.

**४.** म्हणून, कायदा अधिनियमित करून त्याद्वारे, प्रस्तावित केलेल्या उक्त खाजगी विद्यापीठांची स्थापना करण्यास परवानगी देण्यासाठी आणि त्यामध्ये, उक्त विद्यापीठे आणि त्यांची प्रायोजक मंडळे यांचे नाव, ठिकाण व मुख्यालये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यास जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोन मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

**५.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २३ मार्च, २०२६.

**मंगलप्रभात लोढा,**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री.

# सन २०२६ चे वि. प. विधेयक क्रमांक ८— महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

## महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यातील उतारे.

(सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - ३५.)

१.ते६०. ** ** **

### अनुसूची

**भाग एक** ** ** **

### भाग दोन

**[ कलम ६ (१) पहा ]**

| अ.क्र.<br>(१) | विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालये<br>(२) | प्रायोजक मंडळाचे नाव व पत्ता<br>(३) |
|---|---|---|
| ** | ** | ** |
| ** | ** | ** |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८. ]**

**[ महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. मंगलप्रभात लोढा,**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री.**]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.